विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषदेची
संशोधन पत्रिका

# अर्थमीमांसा

भारतीय सौर १९२९
(इ.स. २००८, खंड १)

- भांडवलशाही वित्तीय संरचना आणि सामाजिक कल्याण : एक दृष्टीक्षेप
- Education and Development
- भारतीय अर्थशास्त्रज्ञांच्या विश्लेषणातून व्युत्पन्न साम्राज्यशाहीचे सिद्धान्तन
- Implications of Globalisation for Indian Agriculture
- सामंजस्य कराराचे स्वरुप आणि नागरी सहकारी बँकांचे भवितव्य

- पीएच्.डी. प्रबंधाचा सारांश
- ग्रंथ परिचय
- ३१ व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल

विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषदेची
संशोधन पत्रिका

# अर्थमीमांसा

भारतीय सौर १९२९
(इ.स.२००८, खंड १)

॥ अनुक्रमणिका ॥

■ भांडवलशाही वित्तीय संरचना आणि सामाजिक कल्याण : एक दृष्टीक्षेप
– श्रीनिवास खांदेवाले ................................1

■ Education and Development
- R.Y. Mahore ........................................8

■ भारतीय अर्थशास्त्रज्ञांच्या विश्लेषणातून व्युत्पन्न साम्राज्यशाहीचे सिद्धान्तन
– मुक्ता जहागिरदार ................................22

■ Implications of Globalisation for Indian Agriculture
- Vinayak Deshpande ......................32

■ सामंजस्य कराराचे स्वरूप आणि नागरी सहकारी बँकांचे भवितव्य
– एच्.आर.तिवारी ................................54

■ आदिवासी क्षेत्राचा आरोग्य दर्जा : अमरावती विभागाचा सर्वंकष अभ्यास – (पीएच्.डी. प्रबंधाचा सारांश)
– राजेश बुरंगे ........................................58

■ Developement with Dignity -अमित भादुरी यांच्या ग्रंथाचा परिचय ............................66

■ ३१ व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल ............69

❑ प्रमुख संपादक ❑
दि.व्यं. जहागिरदार

❑ सल्लागार मंडळ ❑
श्रीनिवास खांदेवाले
पुष्पा तायडे
आर.जी.टाले
व्हि.जी.कांत

❑ संपादकीय पत्रव्यवहार ❑
दि.व्यं. जहागिरदार
''व्यंकटेश'', १२, गुलमोहर कॉलनी,
कॅम्प, अमरावती – ४४४ ६०२
दूरध्वनी (०७२१) – २६६१८५१

## संपादकीय .....

**'अर्थमीमांसा'** या संशोधनपत्रिकेचा पहिला अंक सादर करताना मनस्वी आनंद होत आहे. विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषदेचे माजी अध्यक्ष, वर्तमान कार्याध्यक्ष, अध्यक्ष व कार्यवाह आणि सर्व सदस्य या आनंदात सहभागी आहेत. भारतीय स्वातंत्र्याचे हीरक महोत्सवी वर्ष आणि भारतीय स्वातंत्र्य समराच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षात आपली संशोधन पत्रिका प्रसिध्द होत आहे ही विशेष उल्लेखनीय व आपणा सर्वांसाठी अभिमानाची आणि अत्यंत आनंदाची बाब आहे.

तीन तपांपूर्वी स्थापन झालेली विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषद ही भारतातील प्रादेशिक स्तरावरील अर्थशास्त्राच्या अभ्यासकांची एक फार जुनी परिषद आहे याचा आपल्याला सार्थ अभिमान आहे. अपवादात्मक वर्षे वगळता आतापावेतो ३२ वार्षिक अधिवेशने परिषदेच्या वतीने विदर्भातील शहरांमधून तसेच लहान गावांमधूनही महाविद्यालयांच्या सहकार्याने आयोजित झाली आहेत. डॉ. ढेकणे, डॉ.नाणेकर, प्रा. पिंपरकर, डॉ. खांदेवाले, प्राचार्य खर्चे, प्रा. ओझरकर, प्रा.पाटील एम्.ए., डॉ. अंजली कुळकर्णी, अशा अनेक जेष्ठ व ख्यातनाम प्राध्यापकांनी परिषदेचे अध्यक्षपद भूषविले आहे. डॉ. श्रीनिवास खांदेवालेंच्या मार्गदर्शनाखाली डॉ. माहोरे आणि डॉ. जहागिरदार यांनी सतत नऊ वर्षे सचिवपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळून परिषदेला स्थैर्य प्राप्त करून दिले. या दोघांनीही पुढे परिषदेचे अध्यक्षपदही भूषविले होते.सध्याचे सचिव, प्रा.व्ही.जी.कांत व डॉ.आर.जी.टाले परिषदेच्या कार्याची धुरा समर्थपणे पेलीत आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे गेल्या बारा वर्षांमध्ये चार स्त्रीयांना अध्यक्षपदाचा सन्मान प्राप्त झाला हे आवर्जून सांगितले पाहिजे. वैदर्भीय संस्कृतीच्या गुणवैशिष्ट्यांचा तो परिणाम आहे.

या प्रकारच्या परिषदांना संशोधनपत्रिका असावी अशी एक परंपरा आहे. परिषदेचे ते वैचारिक मुखपत्र असते. विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषदेच्या कार्याची प्रगती होत असली तरी संशोधनपत्रिका सुरू करण्याची इच्छा पूर्ण झालेली नव्हती. तो योग आज येत आहे. परिषदेच्या रौप्य महोत्सवी वर्षात डॉ.मुक्ता जहागिरदार यांचा 'अभिजात अर्थशास्त्र आणि राज्य हस्तक्षेपनीती' हा प्रबंध त्यांच्याच खर्चाने परिषदेच्या वतीने प्रकाशित झाला. त्याच्या उत्पन्नातून संशोधन पत्रिकेसाठी कायमस्वरूपी मदत व्हावी हाच उद्देश होता. मात्र या उपक्रमातून अपेक्षित उत्पन्न मिळू शकले नाही. तथापि जे उत्पन्न मिळाले त्याच्या व्याजातून आपल्या विदर्भ विद्यापीठ शिक्षक परिषदेची संशोधन पत्रिका 'अर्थमीमांसा' चा पहिला अंक आपण प्रकाशित करीत आहोत याचा उल्लेख केला पाहिजे. वर्षातून दोन अंक प्रकाशित व्हावेत अशी इच्छा आहे. आपली आर्थिक संसाधने आणि अंकाचा खर्च लक्षात घेऊन परिषदेचे सदस्य व सदस्येतर व्यक्ती व संस्थांसाठी अंकाची किंमत आपल्याला ठरवावी लागेल. जाहिरातीही मिळवाव्या लागतील. प्रस्तुत पहिल्या अंकाची संपूर्ण तयारी केवळ एका महिन्यात केली. त्यामुळे

संशोधनपत्रिकेच्या बोधवाक्यादी बाबींचीही पूर्णता यानंतर करावयाची आहे. आपल्या सगळ्यांच्या सहकार्याने सर्व गोष्टी चांगल्याप्रकारे पार पडणार आहेत. संशोधन पत्रिकेच्या स्वरूपाबाबत सभासदांनी आपल्या सूचना अवश्य कळवाव्यात. आपली संशोधन पत्रिका बहुभाषी असावी. मराठी हिंदी व इंग्रजी असे तीनही भाषेतील लेख त्यात असावेत अशी योजना आहे.

या अंकात चार प्रमुख लेख, एक टिपण, पीएच् डी. प्रबंधाचा सारांश आणि ग्रंथ परिचय असा सर्वमान्य आकृतीबंध स्वीकारला असून अखेरीस परिषदेच्या ३१ व्या वार्षिक अधिवेशनाचा (२००७-०८) वृत्तांत दिला आहे. शेअर बाजारातील घसरणीचे वित्तीय संरचनेच्या संदर्भात तात्विक दृष्टीने व्यापक पार्श्वभूमीवर श्रीनिवास खांदेवाले यांचा 'भांडवलशाही वित्तीय संरचना आणि सामाजिक कल्याण : एक दृष्टीक्षेप' हा मुलगामी विवेचन करणारा लेख असून दुसरा लेख आर.वाय् माहोरे यांचा 'Education and Development ' असून तो शिक्षणाचे अर्थशास्त्र ह्या अर्थशास्त्राच्या नवीन शाखेशी संबंधित आहे. या शाखेच्या संशोधनकांना तो निश्चितच उपयोगी होईल. १९ व्या शतकातील भारतीय अर्थशास्त्रज्ञांनी साम्राज्यशाहीबाबत केलेल्या विवेचनाद्वारे मुक्ता जहागिरदार यांनी "भारतीय अर्थशास्त्रज्ञांच्या विश्लेषणातून व्युप्रन्न साम्राज्यशाहीचे सिद्धान्तन" हा लेख सिद्ध केला आहे. भारताच्या वर्तमान संदर्भात अशा स्वरूपाचा लेख त्यातील परिशिष्टामुळे महत्वपूर्ण झाला आहे. जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील प्रभाव स्पष्ट करतांना विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्याच्या बाबत आर्थिक मुद्दांवर प्रकाश टाकणारा विनायक देशपांडे यांचा 'Implications of Globalisation for Indian Agriculture' हा प्रदीर्घ व आकडेवारीने परिपूर्ण तसेच सद्यस्थितीशी संबंधित लेख आहे. नागरी सहकारी बँकावरील दुहेरी नियंत्रणाच्या संदर्भात महाराष्ट्र शासन आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्यातील सामंजस्य करारावर आर.एन. तिवारी यांचे 'सामंजस्य कराराचे स्वरूप आणि नागरी सहकारी बँकाचे भवितव्य' हे महत्वाचे टिपण असून 'आदिवासी क्षेत्राचा आरोग्य दर्जा : अमरावती विभागाचा सर्वंकष अभ्यास' हा राजेश बुरंगे यांच्या पीएच्.डी. प्रबंधाचा गोषवारा आहे. संशोधन पत्रिकेत प्रसिध्द ग्रंथाचा परिचय असतो. यादृष्टीने अमित भादुरी यांच्या गाजलेल्या 'Development with Dignity' या ग्रंथाचा थोडक्यात परिचय करून देण्यात आला आहे.

अर्थशास्त्र हे वर्धिष्णू, व्यापक तसेच लोकप्रिय सामाजिकशास्त्र असून सध्या या विषयाच्या शेकडो संशोधनपर पत्रिका प्रसिध्द होत आहेत. विशेष म्हणजे या संशोधन पत्रिकांना स्वतःचा एक विशिष्ट स्तर असतो अर्थात सर्वांचा स्तर समान नसतो. त्यामुळे अर्थमीमांसा या आपल्या संशोधनपत्रिकेला या क्षेत्रात निश्चितच जागा आहे. भविष्यात आणखी वरचा स्तर ती प्राप्त करेल असा पूर्ण विश्वास आहे. पुढील काळात संशोधकांनी आपले दर्जेदार लिखाण 'अर्थमीमांसा'साठी पाठवावे. हा अंक सिध्द करतांना अनेकांनी तत्परतेने मदत केली त्याबद्दल सर्वांचे आभार. आपणा सर्वांना हा अंक आवडेल ही इच्छा व्यक्त करून संपादकीय आवरते घेतो.

- वि.त्र्यं.जहागिरदार